पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक -६९७ दिनांक -१६/०९/२०२३**

येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर

## जबरी चोरी करणा-या आरोपीस केले जेरबंद

दि. ३१/०८/२०२३ रोजी गुंजन चौक फिर्यादी हे बस स्टॉपवर थांबले असताना असताना मोटार सायकल वरुन दोन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांचा मोबाईल व खिशातील १२००/- रु जबरदस्तीने हिसका मारुन चोरुन नेले आहे म्हणून येरवडा पो. स्टे. गु. र. नं. ६०३/२०२३ भादवि ३९२, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा तपास करत असताना तपास पथकाचे **पोलीस अंमलदार अमजद शेख व अनिल शिंदे** यांना त्यांच्या बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, सदर गुन्हयातील आरोपी हे विश्रांतवाडी भागात येणार आहे.सदरची माहिती मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक येरवडा पोलीस स्टेशन यांना कळविल्याने त्यांनी मिळालेली माहिती वरुन कारवाई करणेबाबत मार्गदर्शन केले.

त्याप्रमाणे तपास पथकाचे अधिकारी पो.उप.निरी. अंकुश डोंबाळे व पोलीस अंमलदार यांनी तेथे जावून संशयीत इसमाला पळून जात असताना त्यास पकडले. त्यास त्याचे नाव पत्ता विचारता **१. सोमेश सुभाष कुसाळे वय २५ वर्षे रा टिंगरेनगर पुणे २. संतोष गरिबदास खंडागळे वय ३१ वर्षे रा महाराष्ट्र हौसिंग सोसा. येरवडा पुणे** असल्याचे सांगितले. त्यांचेकडे चौकशी करता त्यांनी चोरी केल्याचे कबूल करुन सदरचा गुन्हा केल्याचे कबूल केले आहे. सदर आरोपीस अटक करण्यात आली आहे. त्याचेकडून गुन्हयातील चोरीस गेलेला २,०००/- किंमतीचा मोबाईल व गुन्हयात वापरलेली ४०,०००/- रु किंमतीची मोटारसायकल असा एकूण ४२,०००/- रु किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

गुन्हयाचा पुढील तपास तपास पथकाचे अधिकारी पोलीस उप-निरीक्षक अंकुश डोंबाळे करत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-४,पुणे श्री शशिकांत बोराटे,मा.सहा. पोलीस आयुक्त,येरवडा विभाग श्री संजय पाटील वरीष्ठ पोलीस निरीक्षक येरवडा पोलीस स्टेशन श्री. बाळकृष्ण कदम, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्रीमती कांचन जाधव, श्री. जयदिप गायकवाड, यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पोलीस उप.निरीक्षक अंकुश डोंबाळे, पो.उप.निरी. प्रदिप सुर्वे, पोलीस अंमलदार गणपत थिकोळे, दत्ता शिंदे, तुषार खराडे, किरण घुटे, अमजद शेख, सागर जगदाळे, कैलास डुकरे, प्रविण खाटमोडे अनिल शिंदे, राहुल परदेशी, सुरज ओंबासे, दत्तात्रय शिंदे, प्रशांत कांबळे, सुशांत भोसले यांनी केलेली आहे.


येरवडा पोलीस स्टेशन